30

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जिवन आणि कार्य

**डॉ. डोंगरे एल. बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर, जि. नांदेड

**********

भारताच्या इतिहासात अनेक पुरोगामी, सुधारणावादी महिला झाल्या आहेत. त्यामध्ये सावित्रीबाई फुले या अग्रणी आहेत. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या सहवासाने ज्याच्या ज्ञानाची ज्योत पेटवली. त्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार आणि कार्य प्रेरणादायी आणि आदर्शवादी आहे. स्त्री मुक्तीच्या आद्यप्रणेत्या सावित्रीबाई फुले यांचा जन्म ०३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्हयातील नायगांव येथे झाला. सावित्रीबाई फुले यांचे वडील खंडोजी नेवसे हे नायगांवचे इनामदार पाटील होते. कष्टाळु आणि कणवाळु अशा लोकप्रिय खंडोजी नेवसे यांचे संस्कार लहानपणी सावित्रीबाई फुले यांच्यावर खोलवर रुजले होते. बालपणात सावित्रीबाई यांना लिहता-वाचता येत नव्हते पण भारतीय समाजातील स्त्रीयांची दयनिय अवस्था आणि दुय्यम दर्जा पाहुन त्यांना समाजासाठी काहितरी करायला पाहिजे असे मनापासून वाटत होते. महात्मा जोतीबा फुले यांच वडील गोविंदरावांनी जोतीबाचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी केला. लग्नाच्या वेळी जोतीबा फक्त १३ वर्षांचे होते तर सावित्रीबाई फक्त ०८ वर्षांच्या होत्या. सावित्रीबाई स्वभावाने अत्यंत नम्र होत्या.

महात्मा जोतीबा फुले एकदा आपले मित्र सदाशिव गावंडे यांच्याकडे गेले होते. जोतीबा फुले आणि सदाशिव गावंडे यांनी मिशनरीची शाळा चालवणाज्या मिसेस फरारबाई या शिक्षिकेला भेटले मिसेस फरारबाई या म्हणाल्या भारतामध्ये शिक्षणक्षेत्राकडे दुर्लक्ष केल्या जात होते. स्त्रीयांना, दलितांना, गरीबांना सर्वांना शिक्षण दिल्याशिवाय भारताची प्रगती होणार नाही असा विचार मिसेस फरारबाईंनी मांडला. मिसेस फरारबाईच्या विचाराने महात्मा जोतीबा फुले प्रभावित झाले. शिक्षणासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजे अशी प्रेरणा त्यांना मिळाली. शिक्षणरुपी प्रकाशाने अज्ञानरुपी अंधकार नाहिसा करण्यासाठी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी निर्धार केला. अशिक्षित असलेल्या

सावित्रीबाई यांना जोतीबा फुले यांनी स्वत: घरी शिकवले. सावित्रीबाई शिक्षित झाल्यानंतर महात्मा फुले यांनी इ.स.१८४८ साली पुण्यात भिडेच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढली. त्या शाळेत सावित्रीबाई फुले यांनी विनावेतन शिक्षिकेचे कार्य केले आहे. त्याकाळी मुलींना शिक्षण देण्याचे काम करणे म्हणजे महापातक समजले जायचे. कोणत्याही व्यक्तीला अथवा व्यवस्थेला न जुमानता फुले दामपत्यांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य चालू ठेवले. हे कार्य करीत असतांना त्यांना अनेक कटु प्रसंगांना सामोरे जावे लागले. एकदा तर एक इसम शाळेत जात असतांना वाटेत आडवा येवून शाळा बंद करतेस का ? अब्रु घेवु अशी धमकी दिली. अशा प्रसंगी न डगमगता परिस्थितीशी दोन हात करुन सर्व छळ शांतपणे सोसून क्रांतीज्योती सावित्रीबाई यांनी अध्यापनाचे पवित्र कार्य चालूच ठेवले.

फुले दामपत्यांनी मुलींच्या शाळेबरोबरच त्यांनी मुलांचीही शाळा काढली. १८५२ पर्यंत पुणे व आसपासच्या भागात १८ शाळा स्थापन केल्या होत्या. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबाबत आचार्य दादा धर्माधिकारी म्हणतात सावित्रीबाई भारतातील पहिली व थोर क्रांतीकारक स्त्री होती. जोतीबा व सावित्री ही दोघेही आपापल्या परीने क्रांतीचे अग्रदुत होते. जोतीबांचे कर्तृत्व व ऊर्जा सावित्रीबाईच्या अंगी बाणली. पुराणातल्या सावित्रीने यमापासून पतीचे प्राण परत मिळविले. या सावित्रीने पतीचा प्राण आपल्या प्राणात समाविष्ठ करुन घेतला आणि संयुक्त विभुतीमत्व शिल्लक राहिले.

शिक्षणाबाबत सावित्रीबाई फुले म्हणतात आळस व परावलंबण वगैरे न वाढण्यास व मनुष्याच्या अंगचे सदगुण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा धैर्यशील निर्भय बनुन विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो म्हणुन फुले दामपत्यांनी केवळ शिक्षकाचेच काम केले नाही तर शिक्षणातील अनेक मुलगामी विचार आपल्या अनुभवाच्या माध्यमातून मांडून एक वेगळा आदर्श आजच्या पिढीसमोर निर्माण केला आहे.

महात्मा फुले हे बोलके सुधारक नव्हते तर ते कृतिशील सुधारक होते. महात्मा जोतीबा फुले स्त्री-पुरुष समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी स्वत: पत्नी सावित्रीबाई फुले यांना आयुष्यभर सन्मानाची वागणुक दिली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना शाळा निर्माण करुन समाधान वाटत नव्हते. समाजात शिक्षणाबरोबरच बालविधवा, कुमारीमाता, बालविवाह यासारख्या समस्या त्यांना अस्वस्थ करीत होत्या. फुले दामपत्यांनी स्त्री मुक्तीचा विचारच मांडला नाही तर त्या समस्याच्या मुळाशी जाऊन त्यावर प्रतिबंधात्मक उपाय शोधले. फुले दामपत्यांनी आपल्या घराशेजारी शेख उस्मान यांच्या जागेत २८ जानेवारी १८५३ रोजी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. कोणा विधवेने अज्ञानपणाने वाकडे पाऊल पडून ती गरोदर राहिली तर तिने या गृहात जाऊन बाळंत होवून जावे. अशी जाहिरात लावण्यात आली होती. १८७३ रोजी काशीबाई या महिलेच्या पोटी एक मुलगा जन्माला आला. या काशीबाईच्या मुलास फुले दामपत्यांनी दत्तक घेवून त्याला शिकवून डॉक्टर बनवले. फुले दामपत्यांचा यशवंत या मुलाचा आंतरजातीय विवाह घडवून आणला. हा आंतरजातीय विवाह हा महाराष्ट्रातील पहिला आंतरजातीय विवाह आहे आणि जाती अंतरसाठी केलेले एक महत्वाचे पाऊल होते.

सावित्रीबाई फुले यांनी स्त्री उध्दारासाठी स्त्री संघटनेची स्थापना केली. १८६० पासून फुले दामपत्यांनी विधवा पुर्नविवाहाबाबत सक्रिय कार्य केले. पुण्याच्या आपल्या फुले वाडयातच दर १५ दिवसांनी बैठका घेवून प्रौढ स्त्रीयांचे शिक्षण, कुमारीमाता, परितक्त्या, विधवाविवाह, बालहत्या, बालजरट विवाह, अस्पृश्यता निवारण इत्यादीवर चर्चा घडवून आणुन त्या सोडवण्याचा प्रयत्न स्त्री संघटनाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांनी केला. म्हणुन सावित्रीबाई फुले या स्त्री मुक्तीच्या खज्याखुज्या क्रांतीज्योती होत्या.

सावित्रीबाई फुले यांचे व्यक्तीमत्व हे अष्टपैलु होते. त्या उत्तम कवयित्री होत्या. काव्यफुले हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १८५४ साली प्रकाशित झाला. दुसरा काव्यसंग्रह बावनकशी सुबोधरत्नाकर या नावाने १८९१ साली प्रकाशित झाला काव्यफुले या काव्यसंग्रहाच्या एका रचनेत सावित्रीबाई फुले म्हणतात.

रची काव्य सोपे भुजंग प्रयासे
मनी वृत्त आखुन गाणे लिहते
भृतारास अर्पी बहु आदराने
नसे ते इही हो परी चितनान

वरील रचनेतून सावित्रीबाईंनी अत्यंत आदरभावाने व आपल्या पतीच्या कार्यकर्तृत्वाने प्रभावित होऊन आपले पती जोतीबा यांना अर्पण केल्याचे दिसून येते.

सावित्रीबाई फुले यांनी वाळवेकरांच्या गृहिणी मासिकातून स्त्रीयांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली आहे. त्यांच्या लेखनाचा विषय प्रामुख्याने सामाजिक असून त्यात जातीभेद निर्मुलन, स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालविवाह, शुद्रातीशुद्रा करीता शिक्षण इत्यादी विषयावर आपले विचार रोखठोकपणे मांडण्याचा प्रयत्न सावित्रीबाई यांनी केला. सावित्रीबाई यांना लेखनकौशल्या बरोबरच भाषणकौशल्य ही अवगत होते. सावित्रीबाई फुले यांनी आपल्या उभ्या आयुष्यात सामाजिक, शैक्षणिक विषयावर भाषणे दिली. उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसन

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.41012
Vidya

व कर्ज यासारख्या गंभीर विषयावर आपले मौलीक विचार प्रकट केले आहे. सावित्रीबाईंनी कर्ज या विषयावर मार्गदर्शन करतांना म्हणतात.

शेटजीचे कर्ज जो घेई | तयाचे सुख सुरु जाई
संकटाने हैराण होई | बेजार होई कर्जदार
कर्जाने लागतसे चिंता | घालवी सारी मालमत्ता
संसारात वाढवी गुंता | आली अंहता ऋणकोची

व्यसन व कर्ज यावर भाषणातून सावित्रीबाई म्हणतात कर्जाच्या माध्यमातून संसारसुखाचा कसा नाश होतो याचे विवेचन केले आहे.

१८९० साली जोतीरव यांचे निधन झाले होते. जोतीरावांच्या जाण्याने सावित्रीबाई एकाकी झाल्या होत्या. जोतीरावाच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी स्वतःला सावरुन मोठया धाडसाने जोतीराव फुले यांचे सत्यशोधक समाजाचे सार्वजनिक सत्यधर्माचे कार्य पुढे अखंडपणे चालू ठेवले. पुण्यात प्लेगची साथ आली होती सावित्रीबाईंनी मानवतेच्या भुमिकेतून जातीपातीचा विचार न करता रुग्ण सेवा केली. प्लेगच्या रुग्णची सेवा करीत असतांना क्रांतीज्योती सावित्रीबाई यांना प्लेगची लागण झाली. त्यातच त्यांचा मृत्यु १० मार्च १८९७ रोजी झाला. अशा या रणरागिणीचा, रत्नाचा विचार आणि कार्य निश्चीतच भारतीय समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या नावाने पुरस्कार, योजना, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे निर्माण करुन चालणार नाही तर त्यांचा विचार समाजातल्या तळागाळापर्यंत प्रचार, प्रसार करुन त्यानुसार शासन आणि जनता आचरणात आणि व्यवहारात आणल्यास खऱ्या अर्थाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले या भारतरत्नास खरी आदरांजली ठरेल.

**संदर्भग्रंथ :-**

१) सावित्रीबाई फुले अष्टपैलु व्यक्तीमत्व - प्रा.ना.ग.पवार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

२) सावित्रीबाई फुले - डॉ.ज्ञानेश्वर तांदळे, साधनासेवा प्रकाशन, पुणे.

३) सावित्रीबाई ज्योतीबा फुले - शांता रानडे, लोकवाङःमय प्रकाशन, मुंबई.

४) राष्ट्रनिर्माते - मा.म.देशमुख, शिवभारती प्रकाशन, नागपूर.

❑❑❑